विजाभज प्रवर्गाच्या अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदान व लाभाबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांकः विभशा-२०१९/प्र.क्र.७०९/विजाभज-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ - वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४,
दिनांक २६ सप्टेंबर, २०१८.

प्रस्तावना -

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिनांक १/११/२००५ किंवा त्यानंतर शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा कर्मचारी १० वर्षाची सेवा पूर्ण होण्यापूर्वी सेवेत असतांना मृत्यू पावल्यास, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देश केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान रु.१०.०० लक्ष अधिक कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली संचित रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषी विद्यापीठे व तत्सम अनुदानित संस्थामधील कर्मचाऱ्यांना वरील शासन निर्णय योग्य त्या फेरफारांसह लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने निर्गमित करण्याची कार्यवाही करावी, असे सदरहू शासन निर्णयात नमूद करण्यात आलेले आहे.

वित्त विभागाच्या निर्देसानुसार विजाभज प्रवर्गाच्या अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत/योजनेच्या सभासदांना सानुग्रह अनुदानाचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये अनुज्ञेय केलेल्या सानुग्रह अनुदान लाभाची योजना व त्यामधील तरतूदी विजाभज प्रवर्गाच्या अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदांना जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.

२. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०८१९१७३२४३९८२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.08.19 17:38:32 +05'30'

(भा.र.गावित)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.मंत्री (इतर मागाव वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण), मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (इतर मागाव वर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण), मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. महालेखापाल महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
५. संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे
६. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व).
७. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व).
८. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
९. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
१२. उप सचिव (सेवा-४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/रोखशाखा), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक , मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती, विजाभज-२